# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, अमरावती

## भरती प्रक्रिया

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अकोला परिमंडळांतर्गत प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, अमरावती अंतर्गत रिक्त असलेल्या पदांच्या पदभरती प्रक्रियेसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरुपात व करार पदध्तीने मानधन तत्वावर पात्र उमेदवाराकरीता पदभरती राबविण्यात येत असुन, इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन विहीत नमुन्यात व विहीत मुदतीत खालीलपदांकरीता अर्ज आमंत्रित करण्यात येत आहे.

**टिपः**-१) सदर नेमणुकीकरीता लागु असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना हा महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध आहे.(http://nhm.maharashtra.gov.in व maha.arogya.maharashtra.gov.in) २)अर्ज जमा करण्याचे ठिकाण- प्राचार्य,आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,अमरावती , जिल्हा स्त्री रुग्णालय(डफरीन) परिसर, श्रीकृष्णपेठ, अमरावती ३)अर्ज जमा करण्याची अंतिम दिनांक २१/०८/२०२३ (कार्यालयीन वेळत सुट्टीचे दिवस वगळुन) ४)पदस्थापनेचे ठिकाण,वयाची अट, शैक्षणिक अर्हता व अनुभव या बाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

| पदाचे नाव | पद संख्या |
|---|---|
| प्रशासकीय अधिकारी | खुला-१ |
| शाखा सदस्य (स्त्री) | खुला.१ |

सहीने
प्राचार्य,
आरोग्य व कुटूंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र अमरावती

# राष्ट्रीय आरोग्य अभियान

## आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, अमरावती

## भरती प्रक्रिया

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत अमरावती परिमंडळांतर्गत मा. प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, अमरावती अंतर्गत रिक्त असलेल्या पदांच्या पदभरती प्रक्रियेसाठी खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे निव्वळ कंत्राटी स्वरुपात व करार पदध्तीने मानधन तत्वावर इच्छुक उमेदवाराकडुन विहित नमुन्यात विहित मुदतीत अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ क्र | पदाचे नाव | मानधन | पद संख्या | पदस्थापनेचे ठिकाण | वय | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **प्रशासकीय अधिकारी** | एकत्रित रु. २०,०००/- दरमहा | अराखीव-१ | आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र अमरावती | खुल्या प्रवर्गासाठी १८ ते ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष तसेच ६० वर्षा पेक्षा जास्त वय नसणारे शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त कर्मचारी अर्ज करु शकतात. | १) वाणिज्य शाखेचे पदवीत्तर पदवी<br>२) Tally ERP 9<br>३) एमएस-सीआयटी असणे आवश्यक आहे. | शासकीय/ निमशासकीय प्रशासकीय कामाचा ३ वर्षाचे अनुभव आवश्यक |
| २ | आरोग्य सहाय्यीका | एकत्रित रु. १८,०००/- दरमहा | अराखीव-१ | तालुका प्रशिक्षण केंद्र चिखलदरा जि. अमरावती | खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ४३ वर्ष तसेच ६५ वर्षा पेक्षा जास्त वय नसणारे शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त कर्मचारी अर्ज करु शकतात.) | १)पीएचएन/जीएनएम/बीएससी नर्सिंग/टयुटर मुलभुत प्रशिक्षण उत्तीर्ण असावी.<br>२) एमएस-सीआयटी असणे आवश्यक आहे. | शासकीय/ निमशासकीय प्रशिक्षणाचा ३ वर्षाचे अनुभव आवश्यक |

- **अर्ज स्विकृती :- दि.७/८/२०२३ ते दि.21/8/२०२३ (सुटीचे दिवस वगळुन)**
- **पदभरती संदर्भात पुढील सुचना** (http://nhm.maharashtra.gov.in व maha.arogya.maharashtra.gov.in) या वेबसाईट वर दि.७/८/२०२३ रोजी प्रकाशित करण्यात येईल.

## अटी व शर्ती:-

१) पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असुन त्या व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

२) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. तसेच प्रशासकिय अधिकारी या पदाकरीता सेवानिवृत्त उमेदवारास कमाल वयोमर्यादा ७० वर्षापेक्षा जास्त नसावी.

३) वयाच्या ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडुन शारीरीक दृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

४) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असुन, त्यांचा कालावधी अकरा महिने एकोणतिस दिवस किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी भरण्यात येणार आहेत. अथवा त्या आधी मंजुरी न मिळाल्यास पदे कधीही समाप्त करण्यात येतील.

५) खुल्या प्रवर्गासाठी रु.१५० व राखीव प्रवर्गासाठी रु.१०० इतके अर्ज शुल्क डिमांड ड्राफट च्या स्वरुपात " प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, अमरावती " यांचे नावे काढुन अर्जासोबत जमा करण्यात यावे .

६) वरील नमुद पदे ही राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर शासकीय सेवेप्रमाणे असलेले नियम अटी व शर्ती याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत.

७) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

८) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

९) अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांच्या सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोंदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत चालु सुस्थितीत राहील याची दक्षता घ्यावी.

१०) सदरहु जाहिरातीस अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील. केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणात्याही संदर्भातील यापुर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

११) अर्जाचा नमुना हा जाहिरातीसोबत प्रसिध्द करण्यात आलेला असून, सदरील नमुन्याप्रमाणे अर्ज नसल्यास , उमेदवारांचा अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.

१२) उमेदवारांचा अर्ज अपुर्ण व अर्धवट भरलेला असल्याने तसेच आवश्यकतेनुसार कागदपत्रे जोडले नसल्यास नाकारला गेल्यास सर्वस्वी जबाबदारी ही उमेदवारांची राहील याबाबत उमेदवारांना तक्रार करता येणार नाही.

१३) विहीत नमुन्यातील अर्जासोबत १) वयाचा पुरावा २) पदवी/पदविका/पदवीत्तर पदवी प्रमाणपत्र ३) गुणपत्रिका ४) कौन्सील रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र (As Applicable) ५) शासकीय/निमशासकीय संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र व सेवानिवृत्तीचे आदेश ६) संगणक अर्हतेचा प्रमाणपत्र ८) Tally ERP9 इत्यादी कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन जोडण्यात याव्यात व तसेच पडताळणीसाठी मुळ कागदपत्रे सोबत ठेवावीत.

१४) शासकिय व निमशासकिय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणा-या अनुभवाचाच विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल. (टिप :- ज्या पदाकरीता अर्ज केला आहे त्या पदाकरीता अनुभव असलेलाच ग्राहय धरण्यात येईल.)

१५) महाराष्ट्र नागरी सेवा नियम २००५ अन्वये लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र नमुना- अ या प्रपत्रात सादर करणे आवश्यक राहील.

१६) निवड झालेल्या उमेदवारांना करारपत्रातील अटी मान्य असल्याबाबत रु.१००/- बॉन्ड पेपरवर करारनामा पदावर रुजू होताना सादर करावा लागेल.

१७) **गुणांकन पध्दत (Merit List नुसार)** - उपरोक्त सर्व पदांकरिता गुणांकन पध्दतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबवीण्यात येईल.

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे 50 प्रमाणे Proportion काढाण्यात येईल (उदा.60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 50% प्रमाणे Propartion = 60*50/100+30) | 50 गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्याण्यात येईल) | अधिकत्तम 20 गुण द्यावेत.मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे 20 प्रमाणे Proportion काढण्यात येईल. (उदा.1 Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पुर्ण करुन अतिरिक्त B-Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पुर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवार B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात 60% गुण प्राप्त असल्यास त्याचे 20% प्रमाणे Propartion = 60*20/100 = 12 गुण | 20 गुण |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक 1 वर्षासाठी 6 गुण देण्यात येईल. (1 वर्षाकरिता 6 गुण, जास्तीत जास्त 30 गुण) | 30 गुण |
| एकुण | | **100 गुण** |

अ) सदरील गुणानुक्रमानुसार निवड करताना उमेदवारांची प्रवर्ग निहाय गुणांकन यादी (Merit List) तयार करण्यात येईल. त्यानुसार उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येईल.

आ) गुणांकन यादी तयार केल्यानंतर दोन किंवा त्यापेक्षा उमेदवारांना समान गुण असल्यास ज्या उमेदवाराचे वय जास्त आहे अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. तसेच उमेदवारांचे गुणांकन (Merit) व वय देखील समान असेल तर अशा वेळी उमेदवाराचा संबंधीत पदाशी निगडीत अनुभव जास्त असेल अशा उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

इ) एकूण पदांच्या 50% प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल.

ई) गुणांकन पध्दतीनुसार भरण्यात येणाऱ्या पदांकरिता कोणत्याही प्रकारची मुलाखत घेण्यात येणार नाही. (NHM च्या मार्गदर्शक सुचनेनुसार)

१८) निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांमध्ये नियुक्तीचे ठिकाणी रुजू होणे बंधनकारक राहील अन्यथा त्यांची नियुक्ती आदेश संपुष्टात आणून, प्रतिक्षाधिन यादीतील पुढील उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल.

१९) अर्जासोबत सादर केलेल्या छायांकीत प्रत व मुळ दस्तावेज यांचेमध्ये तफावत आढळल्यास अथवा माहिती खोटी आढळल्यास उमेदवारांची निवड रदद् करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२०) भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे, पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करणे निवड प्रकियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार, इत्यादी प्रकारचे सर्व अधिकार हे खालील स्वाक्षरीकर्त्यांनी राखुन ठेवलेले आहेत.

२१) पदभरती संबंधीत सर्व माहिती सुचना व तत्सम (http://nhm.maharashtra.gov.in व maha.arogya.maharashtra.gov.in या Website वरच प्रकाशित करण्यात येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही. यास्तव्र सदर Website वरील सुचना इत्यादिबाबत पाहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

२२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कर्मचा-यांना सदर पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास त्या कर्मचा-यांनी आपल्या कार्यालय प्रमुखाची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक राहील व तसे परवानगी पत्र सदर अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील, तसे परवानगी पत्र नसल्यास व राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर अर्जदाराचा अर्ज अपात्र करण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**अर्ज सादर करण्याचे पत्ता :- प्राचार्य,आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,अमरावती , जिल्हा स्त्री रुग्णालय (डफरीन) परिसर, श्रीकृष्णपेठ, अमरावती**

प्राचार्य,
आरोग्य व कुटूंब कल्याण
प्रशिक्षण केंद्र, अमरावती

(डॉ.तरंगतुषार वारे)
उपसंचालक आरोग्य सेवा
अकोला मंडळ अकोला

Stick here latest Photograph, Sign Across

# National Health Mission

## Recruitment 2023

## Application Form

## Health and Family Welfare Training Center, Amravati

(All fields in the forms are mandatory to be filled. Incomplete form submitted will be treated as rejected)

| | | |
|---|---|---|
| Exact Name of Post applied for : | | |
| Name: | | |
| Father's/Husband's Name: | | |
| Date of Birth(DD/MM/YYYY) | Blood Group: | Gender: |
| Marital status : | Existing NHM Employee<br>(Yes/ No)<br>Retired Employee<br>(Yes/ No) | Nationality: |
| Original Category : | Applying for Category: | Caste Certificate Attached<br>**Yes/No** |
| Demand Drafts Details :- | | |
| Name of Bank - | DD Amount in RS. | DD Number |

Address/Contact Details: (Name of the District and Pin code is compulsory)

| | |
|---|---|
| Address(Present):<br>State<br>Pin:<br>Contact No: | Address (permanent):(Write same if same as Present Address)<br>State<br>Pin:<br>Contact No: |
| E-Mail Id Correspondence: | Alternate E-mail id for Correspondence (if any): |

| Languages Known:<br><br>(Write "Y" / "N") | English | Hindi | Marathi | Other (Please Specify below) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

| Computer Proficiency: |
|---|

Academic /Professional Educational all summary: (Starting form most recent)

| From<br><br>(MM/YY) | TO<br><br>(MM/YY) | Degree/Diploma | University/Institute | Specialization/ Subjects | Final Year Total Marks & Obtained Marks | Final Year Percentage ( %) |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

Permanent Work Registration No: (Only for MO/Faculty Member) :-

Experience in Health Departmanet

| Sr. No | Form<br><br>(MM/YY) | To<br>(MM/YY | Organization | Designation | Responsibilities<br><br>(Min.30 & Max.50 Words) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| Total Experience (In Years & Months): | | | | Relevant Experience to the post applied (In Years & Months): | |

| |
|---|
| Details in Training Experance |
| Declaration:<br><br>I hereby declare that all statements made in the application are true, Complete and correct to the best of my knowledge and belief. I understand that in the event of any information being found untrue/false/incorrect or I do satisfy the eligibility criteria my candidature will be cancelled, without assigning any reason thereof. I have read the content of the advertisement and agree to abide by the rules, regulations and procedures for appointment to the post applied for.<br><br>Name:<br><br>Place:<br><br>Date Signature |